# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई.

जवाहर बालभवन, तळमजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड (पश्चिम), मुंबई ४०० ००४.
दुरध्वनी क्र. ०२२-२३६३००८१ / ८६ E-mail :- dyde_mumbai@rediffmail.com

**दिनांक** : ०२/०७/२०२०

## इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२०-२१
## प्रसिद्धी निवेदन - ०१/२०२०

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे कामकाज मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महापालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७/०१/२०१७, दि.०७/०३/२०१९ व दि. २३/०६/२०२० अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ **https://mumbai.11thadmission.org.in** आहे.

सन २०२०-२१ या वर्षासाठीच्या इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी, विद्यार्थी व पालकांसाठी अर्जाबाबत संभाव्य वेळापत्रक व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | संबधित स्तर |
|---|---|---|---|
| १. | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची संकेतस्थळावर नोंदणी | दि. ०२/०७/२०२० पासून दि. १२/०७/२०२० पर्यंत | मुख्याध्यापक / प्राचार्य, शाळा / कनिष्ठ महाविद्यालये |
| २. | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदविलेली माहिती तपासणी करून ऑनलाईन अंतिम करणे. | दि. ०२/०७/२०२० पासून दि. १३/०७/२०२० पर्यंत | विभागीय शिक्षण उपसंचालक |
| ३. | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे, प्रवेश अर्ज भाग - १ भरणे व माहिती अप्रुव्ह करणेसाठी शाळा / मार्गदर्शन केंद्र निवडणे आणि प्रवेश अर्ज अप्रुव्ह झाला आहे याची खात्री करणे. | दि. १५/०७/२०२० पासून महाराष्ट्र राज्य मंडळाची इ. १० वी परीक्षेचा निकाल जाहीर होईपर्यंत | विद्यार्थी स्वतः पालक / शाळांच्या मदतीने |
| ४. | विद्यार्थी प्रवेश अर्जातील माहिती भाग - १ ऑनलाईन तपासून अप्रुव्ह करणे आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधणे. | दि. १६/०७/२०२० पासून महाराष्ट्र राज्य मंडळाची इ. १० वी परीक्षेचा निकाल जाहीर होईपर्यंत | संबधित शाळा / मार्गदर्शन केंद्रे |
| ५. | विद्यार्थ्यांनी भाग - २ (पसंतीक्रम) नोंदविणे व सबमिट करणे (भाग १ - सह) | इ. १० वी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यापासून सुरु | विद्यार्थी स्वतः पालक / शाळांच्या मदतीने |

यापुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक यथावकाश जाहीर केले जाईल.

## मुख्याध्यापक / विद्यार्थी – पालक यांच्यासाठी सूचना :-

१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी चे सर्व प्रवेश ऑनलाईन पद्धतीनेच होतील व सदर क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये सहभागी होतील, याची दक्षता घ्यावी. सदर क्षेत्रामध्ये इ. ११ वी चे प्रवेश **ऑफलाईन** पद्धतीने दिल्यास ते अमान्य ठरतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

२) सदर प्रक्रियेबाबत पुरेशा प्रमाणात प्रचार व प्रसार विद्यार्थी, पालक यांचेपर्यंत माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांनी करावा.

३) संदर्भिय शासन निर्णयानुसार केलेय सुधारणांबाबत संबधितास अवगत करण्यात यावे. आरक्षणाबाबत सुधारित तरतुदी (एसईबीसी - १२% व दिव्यांग - ०४%) तसेच कोटानिहाय आरक्षण (इन-हाऊस कोटा - १०%, व्यवस्थापन कोटा - ५%अल्पसंख्याक कोटा -५०%) याबाबत आवश्यक जागृती करावी.

४) ऑनलाईन प्रवेश क्षेत्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी (कोणत्याही कोट्यातून) प्रत्येक विद्यार्थास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन रजिस्ट्रेशन / नोंदणी करणे आवश्यक आहे.

५) सद्यस्थितीत कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती व त्याअनुषगाने सर्व नियम पाळणे आवश्यक आहे.

६) शाळा / महाविद्यालयांची नोंदणी सुरु झाल्यानंतर त्यासाठी गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. ऑनलाईनकरीता शाळा / महाविद्यालयांना आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा देण्यात येत आहे. त्यानुसार ऑनलाईनच कागदपत्रे तपासून या कार्यालयाच्या स्तरावर रजिस्ट्रेशन अंतिम केले जाईल. कोणासही समक्ष बोलविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७) सन २०२०-२१ मध्ये माहितीपुस्तिका छापील स्वरूपात दिली जाणार नसल्यामुळे ऑनलाईन नोंदणी करतानाच विद्यार्थ्यांना लॉगीन आय. डी. व पासवर्ड प्राप्त होईल आणि माहितीपुस्तिकेची प्रत संकेतस्थळावर व मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध असेल.

८) मुंबई महानगरक्षेत्रातील विद्यार्थ्यांची माहिती अप्रुव्ह करणे व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणेसाठी त्यांची इ. १० वी ची माध्यमिक शाळा त्यांना सहाय्य करेल. तसेच मुंबई महानगर क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांची माहिती अप्रुव्ह करणे व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणेसाठी आवश्यकतेनुसार मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करण्यात करण्यात आलेली आहे, याची माहिती इ. ११ वी ऑनलाईन माहितीपुस्तिकेत उपलब्ध आहे. **शाळास्तरावरून अर्ज अप्रुव्ह करण्याची कार्यवाहीसुद्धा ऑनलाईनच करावयाची आहे.** विद्यार्थ्यांना त्यासाठी शाळेत / मार्गदर्शन केंद्रावर जावे लागू नये याची दक्षता शाळा व मार्गदर्शन केंद्रांनी घ्यावी.

९) प्रवेश प्रक्रिया शुल्क जमा करणेसाठी केवळ ऑनलाईन सुविधा उपलब्ध असणार आहे. रोख रक्कम जमा करता येणार नाही. तरी ऑनलाईन शुल्क जमा करणेच्या विविध पद्धती विद्यार्थी व पालकांना समजावून सांगणेसाठी / जागृती करणेसाठी शाळा / महाविद्यालयांनी पुरेसे

देण्यात यावे (उद्बोधन / प्रशिक्षण देणेसाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, सामाजिक अंतर पाळावे).

१०) विद्यार्थ्यांनी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा (भाग - २) (ऑप्शन फॉर्म / पसंतीक्रम) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ. १० वी च्या निकालानंतर भरावयाचा आहे.

११) तत्पुर्वी विद्यार्थ्यांनी भाग - १ भरून अप्रुव्ह करून देण्याची जबाबदारी संबधित माध्यमिक शाळेची राहील. तसेच मुंबई महानगरक्षेत्राबाहेरील व राज्य मंडळाव्यतिरिक्त इतर विद्यार्थ्यांच्या इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा (भाग - १) अप्रुव्ह करण्याची जबाबदारी मार्गदर्शन केंद्राची राहील.

१२) मुख्याध्यापक व तंत्र सहाय्यक यांचे प्रशिक्षण, पालक व विद्यार्थ्यांसाठी उदबोधन वर्ग घेण्यात येतील याचे वेळापत्रक वेळोवेळी जाहीर केले जाईल.

१३) कोविड — १९ प्रादुर्भाव रोखण्यासाठीचे सर्व निकष पाळून प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होणेसाठी सर्व घटकांनी सहाय्य करावे.

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राध्यान्य** (First Come First Serve) **हि फेरी होणार नाही, याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी.** **<u>दक्षता घ्या, सुरक्षित राहा.</u>**

सदरचे प्रसिद्धी निवेदन या कार्यालयाच्या **dydemumbai.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.

AVINASH C:\Users\COMP\Desktop\Online 2020-21\Press note - 02.07.2020.doc